वार्षिक अहवाल २००३ - ०४



महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

अनुक्रमणिका

अध्यक्षांचे मनोगत	१
२००३ - ०४ - एक संस्मरणीय वर्ष	३
महत्वाचे आदेश व आयोगाने पुढाकार घेतलेल्या संबंधित बाबी	५
परिशिष्टे	९

अध्यक्षांचे मनोगत

सन २००३-०४ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासह देशांतील राज्य वीज नियामक आयोगांच्या अधिकारांत बदल झाले.

दिनांक १० जून, २००३ रोजी अस्तित्वांत आलेल्या विद्युत अधिनियम (विअ), २००३ खाली राज्य आयोगांची स्थापना आता अनिवार्य झाली आहे. यापूर्वी, आयोग मुख्यत्वेकरुन वीज दर निश्चितीचेच कार्य करीत होते आणि इतर अधिकार सोपविणे हे राज्य शासनाच्या इच्छेवर अवलंबून होते.

आता या सर्वांत बदल झाला आहे. नवीन अधिनियमाखाली आयोगाची भूमिका व्यापक झाली असून त्याच्या अधिकारांत अनेकपटीने वाढ झाली असल्याने त्याच्यावर आता परवाने देणे, वीज दराची निश्चिती करणे व ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासंबंधीच्या जबाबदाऱ्या विस्तृत प्रमाणावर आल्या आहेत. विद्युत क्षेत्राचे नियमन करणारे सध्याचे कायदे, तात्पुरत्या काळासाठी राखून ठेवलेल्या काही ठराविक तरतुदी वगळता, रद्द करण्यात आले आहेत.

स्वतंत्र, पारदर्शक व व्यावसायिक क्षमता असलेल्या राज्य नियामक आयोगांना वीज क्षेत्रांत येथून पुढे महत्वाची भूमिका बजावयाची आहे आणि, आढाव्याच्या या वर्षांत, आयोगास नवीन कायद्याखालील अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले असून ते अहवालाच्या पुढील पानांवरुन दिसून येईल.

मुंबईत विद्युत वितरण करणारे देशांतील खाजगी क्षेत्रातील सर्वांत जुने व मोठे असे दोन परवानेधारक व महापालिकेचा एक उपक्रम, अहमदनगर जिल्ह्याच्या काही भागात विद्युत पुरवठा करणारी एक सहकारी संस्था तर राज्याच्या उरलेल्या भागांत (व मुंबईच्या काही भागांत) वीज पुरवठा करणारे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ - असे महाराष्ट्रांतील विद्युत क्षेत्राचे आगळे स्वरुप आहे. महाराष्ट्रात स्वयं-सेवी संस्था व ग्राहक हितासाठी जागरुक असणाऱ्या संस्था मोठ्या प्रमाणावर असून त्यांनी जनहितासाठी पुरोगामी कार्य केले आहे. म्हणूनच, गेल्या पाच वर्षांत देशामध्ये आपल्या आयोगाच्या कामकाजांत जेवढे स्वारस्य दाखविण्यात आले तेवढे स्वारस्य अन्य आयोगांच्या कामकाजांत दाखविण्यात आलेले नाही, असे म्हटले तर वावगे होणार नाही. प्रत्येक प्रकरणात व मुद्दयांवर, प्रत्येक हितसंबंधी गट व स्वतंत्र संस्था आणि व्यक्ती यांच्याकडून निवेदन-प्रतिवेदनांचा वर्षाव करण्यात येतो. खरे तर, विअ, २००३ मध्ये अभिप्रेत असलेल्या अनेक बदलांपैकी काही बदल घडवून आणण्यासाठी तर यापैकी काही स्वयं-सेवी संघटनांनी, तसेच परवानेधारकांसह इतर हितसंबंधितांनी देखील, आयोगास उद्युक्त करण्यात वेळ वाया जाऊ दिला नाही.

राज्यांतील विद्युत क्षेत्राच्या इतिहासांत प्रथमच, खाजगी विद्युत कंपन्यांचे - टाटा पॉवर आणि रिलायन्स एनर्जी यांचे - वीज दर निश्चितीकरणाचे काम आयोगाकडून करण्यात येत आहे. अशीच प्रक्रिया मुंबईला वीज पुरवठा करणाऱ्या बेस्ट उपक्रमाच्या बाबतीतही सुरु आहे. पवन - उर्जेपासून वीज मिळविण्यासाठीच्या अटी व शर्तींना अंतिम स्वरुप देऊन नूतनशील आणि अ-पारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या विकासास प्रोत्साहन देण्याचे काम आयोगाने पुढे नेले असून, या वर्षांत नगरपालिकांच्या घन कचऱ्यापासून वीज मिळविण्यासाठी अशीच प्रक्रिया सुरु केली आहे.

आयोगासमोरील अनेक वादग्रस्त प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी आयोगास स्वतंत्र सल्लागार संस्था, ग्राहक प्रतिनिधी व इतर माहितगार व्यक्तींच्या नैपुण्याची मदत घ्यावी लागली आणि नवीन अधिनियमांतर्गत निर्माण होणारे विनियम तयार करण्याचे काम हाती घ्यावे लागले. वाढीव अधिकारांबरोबर अधिक जबाबदाऱ्याही येतात. हे नवीन अधिकार पेलताना आयोगास, व त्याचप्रमाणे विद्युत क्षेत्रातील उद्योगांना व ग्राहकांना स्वतःस देखील, अधिक कौशल्य दाखवावे लागणार आहे.

विअ, २००३ मध्ये वीजेची निर्मिती, पारेषण, वितरण, व्यापार व विजेच्या वापरासंबंधीचे कायदे एकत्रीत करण्यात आले आहेत. वीज दरांत सुसूत्रता आणणे, अनुदानासंबंधी पारदर्शक धोरणाची खात्री करणे आणि कार्यक्षम व पर्यावरणास पोषक असे धोरण

आखण्यास प्रोत्साहन देणे, हे अधिनियमाचे उद्देश आहेत. पारेषण आणि वितरण यंत्रणेमध्ये 'खुला प्रवेशा'साठी तरतूद करण्यात आली आहे. कालांतराने अशा प्रकारे 'खुला प्रवेश' देण्यास सुरुवात झाल्यानंतर, ग्राहक त्यांचे वीज पुरवठादार निवडू शकतील, वितरण परवानेधारक दुसऱ्या परवानेधरकाच्या क्षेत्रांत वीज पुरवठा करु शकतील आणि वितरण परवानेधारक हे त्यांच्या निवडीच्या कोणत्याही स्त्रोताकडून विजेची ठोक खरेदी करु शकतील व इतर परवानेधारकांच्या पारेषण/वितरण यंत्रणेच्या माध्यमांतून तिचे वहन करु शकतील. मागील दशकांत, वीज निर्मितीच्या क्षेत्रांद्वारे वीज पुरवठा वाढविण्यावर भर होता, तर विअ, २००३ने विजेच्या किरकोळ विक्रीच्या पातळीवर स्पर्धेच्या शक्यतेस वाव असल्याचे सूतोवाच केले आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासह सर्व नियामक आयोगांवर, क्रॉस-सबसिडी कमी करुन कालौघांत ती काढून टाकणे शक्य व्हावे हे लक्षांत घेऊन वीज दर ठरविणे आणि राज्य शासनाकडून थेट दिल्या जाणाऱ्या अनुदानाचे नियमन करणे, कायद्याने बंधनकारक आहे, याची नोंद होणे आवश्यक आहे.

देशामध्ये स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीच्या विकासास चालना देऊन नवीन अधिनियमात एक महत्वाचे पाऊल पुढे टाकण्यात आले आहे. गट वीज निर्मितीसह स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीस, विशिष्ट वहन आकार आणि, लागू असल्यास, पारेषण तोटे आकार अदा केल्यानंतर परवानगी असून याशिवाय इतर परवानग्या आणि मंजुऱ्यांची गरज नाही, असे अधिनियमात स्पष्ट करण्यात आले आहे.

नवीन अधिनियमात, एका व्यापक तक्रार निवारण यंत्रणेमार्फत ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्याची देखील जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यासाठी, परवानेधारकांना आता ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच स्थापन करावे लागणार असून, ओम्बडसमनकडे अपील करता येतील.

हे सर्व, टप्प्याटप्याने निर्माण होणाऱ्या स्पर्धेमुळे, अधिक कार्यक्षम विद्युत उपक्रम आणि ग्राहकांच्या विकल्पास वाढता वाव तसेच अधिक कार्यक्षम व स्वस्त वीज पुरविणारे वितरक याकडे, विद्युत क्षेत्राची दिशा वळवेल. क्रॉस-सबसिडीवर येथून पुढे अधिक बारकाईने नजर राहणार आहे. लहान तसेच मोठे ग्राहक, या नवीन कायद्याखाली मिळणारे हक्क बजावण्यास जेव्हा पुढे येतील व अधिक चांगल्या व्यवस्थेची मागणी करु लागतील तेव्हा त्यांचा, चुकार मक्तेदारी वीज कंपन्यांवर, त्या अधिक पारदर्शक व कार्यक्षम होण्यासाठी दबाव वाढत राहील.

नवीन कायद्यामुळे जी पारदर्शकता येणार आहे तिच्यामुळे स्वस्त आणि अधिक भरवशाच्या विद्युत उर्जेची मागणी वाढतच राहणार आहे. अखेरीस, नवीन कायदा विद्युत क्षेत्रास विजेच्या व्यापाराच्या दिशेने ढकलणार असून त्यामुळे, एकेकाळी बेभरवशाचा व सुमार दर्जाचा विद्युत पुरवठा व महागडी वीज यासाठी स्वतःला जबाबदार न मानणाऱ्या मक्तेदारी विद्युत कंपन्यांचे वर्चस्व असणाऱ्या वीज निर्मिती, पारेषण व वितरण या क्षेत्रांत, जास्त स्पर्धा निर्माण होणार आहे. त्याचबरोबर ठराविक कालमर्यादेत सर्वांना, विशेषतः ग्रामीण भागांत, वीज उपलब्ध करुन देण्याच्या मुख्य आव्हानाकडे विअ, २००३ लक्ष वेधून घेत आहे.

पी. सुब्रहमण्यम

२००३ - ०४ - एक संस्मरणीय वर्ष

विद्युत क्षेत्र व आयोगाच्या दृष्टीने, आढाव्याखालील वर्ष २००३-०४, हे एक संस्मरणीय वर्ष होते. विद्युत अधिनियम (विअ), २००३ , एक ऐतिहासिक कायदा, की ज्यामुळे भारताच्या विद्युत क्षेत्रांत एका नवीन पर्वास सुरुवात झाली, अंमलांत आल्याच्या संदर्भात या वर्षाने नवीन आव्हाने व लक्षणीय घडामोडी पाहिल्या.
विअ, २००३, दिनांक १० जून, २००३ रोजी अंमलांत आल्यापसून, देशाच्या विद्युत क्षेत्राचे नियमन करणाऱ्या कायद्यांच्या चौकटीत आमुलाग्र बदल घडून आला असून त्याचा राष्ट्रीय विकासावर दूरगामी परिणाम होणार आहे. या अधिनियमांत, विजेची निर्मिती, पारेषण, वितरण, व्यापार आणि विजेच्या वापरासंबंधीचे कायदे एकत्रीत करण्यात आले आहेत. या नवीन व्यापक कायद्यामुळे वीज उद्योगांत स्पर्धेचा विकास आणि वाढ होणार असून, ग्राहकांच्या हितसंबंधांचे रक्षण, सर्वांना विजेची उपलब्धता, वीज दरांचे आणखी सुसूत्रीकरण, अनुदान धोरणांत पारदर्शकता, आणि कार्यक्षम व पर्यावरणास पोषक अशा धोरणाच्या वाढीस अनुकूल वातावरण निर्माण होणार आहे. त्यात राज्य विद्युत मंडळांची व्यापक पुनर्रचना व विभाजनही अभिप्रेत आहे.

नवीन अधिनियमांतर्गत राज्य नियामक आयोगांना विद्युत क्षेत्राचे रुपांतर घडवून आणण्यासाठी व्यवस्थापकाची आणि मार्गदर्शकाची मध्यवर्ती व महत्वाची भूमिका बजवावी लागणार आहे. या आधीच्या विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ साली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग हे मुख्यतः एक वीज दर निश्चिती आयोग म्हणून कार्य करीत होते. आयोगावर इतर कार्ये सोपविणे महाराष्ट्र शासनाच्या मर्जीवर अवलंबून होते आणि बरीच इतर कार्ये (जसे परवाने देण्याचे अधिकार) आयोगावर सोपविण्यात आलेली नव्हती. विअ, २००३ने आयोगाच्या अधिकारांत बहुविध वाढ करताना परवाने देणे, वीज दर निश्चिती करणे, तक्रारी निवारण करणे यासाख्या जबाबदाऱ्यांबरोबरच इतर अनेक विस्तृत कार्येही आयोगावर सोपविली आहेत.

अधिनियमाच्या परिणामस्वरुप म्हणून, आयोगास केवळ प्रलंबित असलेले बरेच वादग्रस्त प्रश्नच हाताळावे लागले नसून त्याबरोबरच नवीन कायद्यामुळे निर्माण झालेल्या विविध नवीन प्रश्नांनाही तोंड द्यावे लागले. अधिनियमाच्या संदर्भात राज्यांत विद्युत क्षेत्राचा विकास करताना आयोगास व्यापक दृष्टिकोन अंगिकारावा लागला, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी संबंधित विद्युत पुरवठादारांना एका समान पातळीवर आणण्याची काळजी घ्यावी लागली आणि विद्युत ग्राहकांच्या हितसंबंधांचे रक्षण करावे लागले.

श्री. जयंत देव
सदस्य

डॉ. प्रमोद देव
सदस्य

नियम आणि विनियम

वीज दर, अनुदान प्रदान करण्याची कार्यपध्दती, परवाना आणि पुरवठ्याच्या अटी व कार्यप्रणाली, परवानेधारकांच्या कामगिरींची मानके, पारेषण व वितरण यंत्रणेमध्ये खुला प्रवेश, ग्राहकांच्या तक्रारी निवारणासाठी व आयोगाच्या स्वतःच्या कामकाजाच्या प्रचालनासाठी अशा अनेक-विध बाबींच्या नियमनासाठी, नवीन अधिनियमांत अभिप्रेत असल्याप्रमाणे, आयोगास विनियम तयार करावे लागणार आहेत. महाराष्ट्रांतील विद्युत क्षेत्राची विशिष्ट परिस्थिती ध्यानांत ठेऊन, अधिनियमांतील तरतुदींची, त्यांच्यामागील उद्देश सफल होईल अशा प्रकारे, पारदर्शकपणे व पध्दतशीर रितीने अंमलबजावणी होईल याची काळजी या विनियमांनी घ्यावयाची आहे. या विनियमांचा उद्देश नियमनाच्या धोरणांत निश्चितता राखणे हा देखील आहे.

वरील पार्श्वभूमीवर विनियमांचे महत्व लक्षांत घेऊन, आयोगाने विद्युत कंपन्या/ परवानेधारक, ग्राहक प्रतिनिधी व सल्लागार या सर्वांबरोबरच आयोगने स्वतः या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन सर्वांशी सल्ला-मसलत करुनच हे विनियम तयार करण्याचे ठरविले. विद्युत उपक्रमांनी यासाठी सल्लागार नेमण्याची जबाबदारी स्वीकारली तर विनियमांच्या प्रारुपांवर त्यांच्यात व ग्राहक प्रतिनिधींमध्ये सखोल चर्चा करण्यात आल्यानंतर त्यांचा आयोगांत विचार-विनिमय करण्यांत येतो व त्यानंतर त्यांच्यावर जनतेचे अभिप्राय व सूचना मागविण्यांत येतात.

या अधिनियमाखाली ज्या विविध बाबींवर महाराष्ट्र शासनाने नियम तयार करावयाचे आहेत त्या संदर्भात देखील शासनास सूचना देण्याकरिता वरील कार्य-पध्दतीच अवलंबिण्यात आली. आढाव्याखालील वर्षात, विनियमांचा एक संच अधिसूचित करण्यात आला. इतर विनियम तयार करण्याचे काम प्रगतिपथावर होते.

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि ओम्बडसमन

वरील प्रक्रियेचे पहिले फळ म्हणजे डिसेंबर, २००३ मध्ये अधिसूचित करण्यात आलेले - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि ओम्बडसमन) विनियम, २००३ होय. वितरण परवानेधारकाच्या ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक पध्दतशीर यंत्रणा या विनियमांद्वारे पहिल्यांदाच निर्धारित करण्यात आली आहे.

विनियमांत तक्रार निवारणासाठी एक त्रि-स्तरीय यंत्रणा अभिप्रेत आहे- प्रथम स्तरावर अंतर्गत यंत्रणा असेल; दुसऱ्या स्तरावर ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आहेत - ज्यांची स्थापना वितरण परवानेधारकांनी करावयाची आहे व ज्याच्या तीन सदस्यांपैकी दोन सदस्य हे स्वतंत्र व बाहेरील व्यक्ती असतील; आणि तिसऱ्या स्तरावर 'ओम्बडसमन' असेल ज्यांची नेमणूक आयोगातर्फे करण्यात येईल.

परवानेधारकांना त्यांच्या अंतर्गत गाऱ्हाणे निवारण यंत्रणेच्या (पहिला स्तर) कामकाजात पध्दतशीरपणा आणणे व त्यात सुधारणा करण्याकरिता त्यास प्रसिध्दी देऊन जनतेकडून अभिप्राय मागविणे आवश्यक आहे.

परवानेधारकाने स्थापन करवयाच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांची (दुसरा स्तर - ज्याकडे अंतर्गत यंत्रणेच्या निष्कर्षामुळे असमाधानी असलेले ग्राहक दाद मागू शकतात) संख्या व त्यांच्या सदस्यांची संख्या ही संबंधित परवानेधारकाच्या कामकाजाच्या व्यापावर अवलंबून राहील. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या (मराविमं) वितरण

परिमंडलाशी समतुल्य प्रत्येक क्षेत्रासाठी किमान एक तरी मंच असावा, असे विनियमांत अभिप्रेत आहे. बहुतेक सर्व मंच तीन सदस्यांचे असतील; एक परवानेधारकाचा प्रतिनिधी, एक त्या क्षेत्रातील नोंदणीकृत स्वयंसेवी ग्राहक संरक्षण संस्थेचा प्रतिनिधी आणि अध्यक्ष हा एक सेवानिवृत्त ज्येष्ठ न्यायिक अधिकारी आणि/किंवा प्रशासकीय किंवा अभियांत्रिकी क्षेत्रातील अधिकारी असेल. तक्रार निवारणासाठी आवश्यक ते निदेश देण्याबरोबरच नुकसानभरपाईचे निदेश देण्याचे देखील मंचाला अधिकार असतील.

'ओम्बडसमन' (ज्याकडे मंचाच्या आदेशाविरुध्द ग्राहक अपील करु शकतील) म्हणून आयोग एक किंवा अधिक व्यक्तींची नियुक्ती करु शकेल.

मंचांची स्थापना करण्याचे काम, आढाव्याखालील वर्षाच्या अखेरीस, परवानधारकांकडून विविध टप्प्यांवर चालू होते.

राष्ट्रीय वीज दर धोरण

विअ, २००३ खाली केंद्र सरकारने, आयोगांस वीज दर व इतर संबंधित बाबींसंदर्भात निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शक तत्वे ठरु शकतील असे एक राष्ट्रीय वीज दर धोरण तयार करावयाचे आहे. त्यानुसार, केंद्र सरकारने सदर धोरणाचा प्रारुप तयार केला असून त्यावर अभिप्राय मागविले आहेत. याबाबत सखोल चर्चा करून आयोगाने आपले मत ३० डिसेंबर, २००३ रोजी कळविले आहे.

आयोगास असे वाटले की राष्ट्रीय वीज दर धोरणाद्वारे फक्त मार्गदर्शक तत्वे आखून दिली जावीत आणि वीज दरावर परिणाम करणाऱ्या निकषांची गणना करण्यासाठीच्या विशिष्ट कार्यान्वयन तत्वांची त्यामध्ये दखल घेण्यात येऊ नये. वीज दरावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांची हाताळणी करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे व भूमिका स्थूलमानाने त्यामध्ये मांडण्यात यावी आणि विविध राज्ये व विद्युत उपक्रमांमधील वास्तव परिस्थितीत जी भिन्नता आढळते ती हाताळण्यासाठी आवश्यक ती लवचिकता त्या धोरणात असावी. आयोगाने त्यांचे अभिप्राय त्यांच्या वेबसाईटवर देखील प्रदर्शीत केले आहेत.

मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेच्या वर्धनक्षमतेसंदर्भात राज्य शासनास सल्ला

मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्था या अहमदनगर जिल्ह्याच्या काही भागात वितरण परवानाधारक म्हणून काम करणाऱ्या उपक्रमाच्या वर्धनक्षमतेसंदर्भात, महाराष्ट्र शासनाने अधिनियमातील तरतुदींनुसार आयोगाकडून सल्ला मागितला होता. आयोगाने आपला सल्ला व शिफारशी दिनांक २७ जानेवारी, २००४ रोजी शासनास कळविल्या आहेत.

निरा विद्युत केंद्र, भिवपुरी

आयोगास असे दिसून आले की इतर बाबींबरोबरच, मराविमंशी तुल्यक्षम वितरण क्षेत्रांत कामगिरीच्या व सेवेच्या महत्वाच्या निकषांसंदर्भात - जसे की वितरण तोटे, वसूलीतील कार्यक्षमता, विक्री केलेल्या विजेपैकी किती विजेसाठी देयके पाठविण्यात आली त्याचा सरासरी दर, ग्राहकांकडून येणे असलेल्या थकबाकीचे प्रमाण, कार्यान्वयन आणि देखभाल खर्च, आणि वितरण पारेषणात वारंवार होणारे बिघाड - मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्था ही मराविमंपेक्षा अधिक कार्यक्षमतेने कामे करीत आहे. ही बाब लक्षात घेऊन व इतर पर्यायांचा अभ्यास केल्यानंतर आयोगाचे असे मत झाले की, मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेने वितरण परवानाधारक म्हणून काम न करता एक व्यवस्थापन ठेकेदार म्हणून तिच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रांत आपले कार्य चालू ठेवणे, हाच टिकाऊ पर्याय ठरेल.

आयोगाने सल्ला दिला की, मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेची मालमत्ता मराविमंला संस्थेकडून असलेल्या येणेपोटी हस्तांतरित करण्यात यावी व संस्थेस मराविमंची किंवा त्याच्या वारसदार कंपनीची

भिवपुरी येथील टर्बाइन्स

दीर्घ-कालीन व्यवस्थापन ठेकेदार म्हणून काम पाहू देण्यात यावे. या ठेक्याचा कालावधी हा मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेच्या सध्याच्या परवान्याच्या कालावधी इतका राहील.

मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्था कायमपणे वर्धनक्षम रहावी यासाठी एक काल-बध्द सुधारणा कार्यक्रम राबविणे आवश्यक असल्याचे आयोगाचे मत आहे. यात, ग्राहकांचे १०० टक्के मीटरीकरण, ठराविक कालावधीत वितरणातील तोट्यात कपात, वसूलीच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी लक्षांक ठरविणे आणि सर्वसाधारण मूल्यवृध्दी लक्षांत घेऊन कर्मचाऱ्यांवरील तसेच प्रशासकीय व सामान्य खर्चावरील कमाल मर्यादेचा समावेश आहे. आयोगाचे असेही मत आहे की, सध्याचा आर्थिक माहोल विचारात घेता, ग्रामीण क्षेत्रांत वीज पुरवठा करण्यासाठी कोणत्या तरी स्वरुपांत मदतीची गरज आहे. त्यामुळे, मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेने विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी स्थानिक साधन - संपत्तीवर आधारित विकेंद्रित उर्जा यंत्रणेच्या भांडवली खर्चावर संस्थेला अनुदान देण्याचा महाराष्ट्र शासनाने विचार करावा. यामुळे संस्थेस स्वावलंबी बनण्यास व तिचे कामकाज दीर्घ-काल टिकण्यास मदत होईल तसेच संक्रमण कालावधीत उत्पन्नांतील तूट भरून काढण्यासाठी शासनाच्या महसूली अनुदानावर अवलंबून राहणेही कमी होईल.

कलर-केम उप-केंद्र, ठाणे

वितरण परवान्यासाठी अर्ज

विअ, २००३ अधिसूचित झाल्यावर लगेच, बीएसईएस लि. (जिचे नंतर रिलायन्स एनर्जी लि. असे नामकरण झाले आहे) यांनी मराविमंच्या पाच वितरण क्षेत्रांत (नवी मुंबई, नागपूर, पुणे, औरंगबाद व नाशिक) आणि मुंबई शहरात बेस्ट उपक्रमाच्या पुरवठा क्षेत्रात, वितरण परवान्यांसाठी अर्ज केला. पाठोपाठ टाटा पॉवर कंपनीने देखील मराविमंच्या काही क्षेत्रांसाठीही अर्ज केले. शेवटी, मराविमंने देखील रिलायन्स एनर्जी लि.च्या मुंबई उपनगराच्या वितरण क्षेत्रांतील काही भागसाठी अर्ज केला. या अर्जांवर जनतेचे अभिप्राय मागविण्यात आले. तथापि, एकाच्या क्षेत्रात दुसरा परवाना देण्याबाबतचे धोरण व इतर कार्य-पध्दती निश्चित करावयाच्या असल्यामुळे, या अर्जांवर अहवालाच्या वर्षात निर्णय घेण्यात आलेला नाही.

पारेषण खुल्या प्रवेशासाठी अर्ज

रिलायन्स एनर्जी लि.ने, विअ, २००३, मधील तरतूदीचा उल्लेख करीत, तिच्या मुंबई उपनगराच्या क्षेत्रात अन्य ठिकाणांहून विजेचे वहन करणे शक्य व्हावे म्हणून, मराविमं आणि टाटा पॉवर कंपनीच्या पारेषण सुविधा वापरण्यासाठी अर्ज केला. आयोगाने मराविमं आणि टाटा पॉवर कंपनी यांना, कलम ३५ खाली, काही अटींना अधीन राहून, या सुविधा वापरासाठी उपलब्ध करुन देण्याचे निदेश दिले असून, त्यांना अतिरिक्त क्षमतेच्या उपलब्धते संदर्भात किंवा ती उपलब्ध करुन देण्याच्या अटींवरुन काही वाद निर्माण झाल्यास पुनः आयोगाकडे येण्याची मुभा देण्यात आली आहे.

वीज दरांत सुधारणा

या वर्षी, मराविमं, टाटा पॉवर कंपनी व रिलायन्स एनर्जी लि. या महाराष्ट्रातील तीन प्रमुख विद्युत उपक्रमांनी, वित्तीय वर्ष २००३-०४ करिता वीज दरांत सुधारणा करण्यासाठी, आयोगाकडे अर्ज केले. जाहीर सुनावणीच्या अखेरीस, मराविमंचा वीज दर डिसेंबर, २००३ मध्ये सुधारित करण्यात आला. आयोगाची सन १९९९ मध्ये स्थापना झाल्यापासून प्रथमच, खाजगी विद्युत कंपन्यांना सन २००४-०५ करिता किती वार्षिक महसूलाची गरज आहे याबाबतची माहिती सादर करण्यास सांगण्यात आले. अशा रितीने, खाजगी विद्युत कंपन्यांच्या इतिहासात देखील ही पहिलीच वेळ होती की जेव्हा जनतेला त्यांच्या वीज दरावर आपले मत व्यक्त करण्याची आणि त्यांच्या आर्थिक व कार्यान्वयनासंबंधी विविध बाबींची माहिती तपासण्याची संधी मिळाली. मार्च, २००४ मध्ये रिलायन्स एनर्जी लि. व टाटा पॉवर कंपनी या दोन्ही कंपन्यांच्या प्रकरणी जाहीर सुनावण्या घेण्यात आल्या आणि त्यांचे वीज दरासंबंधीचे अंतिम आदेश तयार करण्याचे काम प्रगतिपथावर होते.

आदेश व याचिका

आढाव्याखालील वर्षात, आयोगाच्या १० सभा झाल्या, आयोगाकडे ५५ नवीन याचिका दाखल झाल्या व ४५ आदेश पारित करण्यात आले.

महत्वाचे आदेश व आयोगाने पुढाकार घेतलेल्या संबंधित बाबी

मराविमंच्या वीज दराचा आदेश

मराविमंने सन २००३-०४ मध्ये वार्षिक महसूल गरजेचे विवरणपत्र आणि त्यांच्या ग्राहकांच्या वीज दरांत सुधारणा करण्यासाठी एक याचिका ७ एप्रिल, २००३ रोजी सादर केली. त्यानंतर, २३ जूलै, २००३ रोजी सन २००३-०४ करिता वार्षिक महसूल गरजेचे विवरणपत्र आणि वीज दर पुनर्विचारासाठी सुधारित याचिका सादर करण्यांत आली.

ग्राहक प्रतिनिधींसमोर मराविमंच्या प्रस्तावाची तांत्रिक छाननी झाल्यानंतर या प्रस्तावावर आपल्या सूचना व हरकती कळविण्यासाठी तो जनतेसमोर ठेवण्यांत आला. अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर आणि नाशिक येथे जाहीर सुनावण्याही घेण्यांत आल्या. आयोगाच्या वीज दर आदेशाचा परिणामकारक भाग आयोगाने १ डिसेंबर, २००३ रोजी निर्गमीत केला व सविस्तर आदेश १० मार्च, २००४ रोजी दिला.

सदर वीज दर आदेशाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः

- विजेचे नवीन दर १ डिसेंबर,२००३ पासून लागू राहतील. जर हे दर १ एप्रिल, २००३ पासून लागू करण्यांत आले असते तर मराविमंच्या उत्पन्नांत रु. १८६ कोटींची भर पडली असती व त्यामुळे दरांतील सरासरी वाढ १.५ टक्के झाली असती.
- वित्तीय वर्ष २००३-०४ साठी विद्युत पुरवठ्याचा सरासरी खर्च प्रति युनिट रु.२.८३ इतका येतो. हा खर्च, विजेच्या दर निश्चितीकरणासाठी विचारांत घेण्यांत आलेले पावि तोटे कमी झाल्यामुळे, वित्तीय वर्ष २००१-०२ मधील पुरवठ्याच्या सरासरी खर्चापेक्षा कमी आहे. आयोगाने निरनिराळ्या वर्गवारीतील ग्राहकांना मिळणारी क्रॉस-सबसिडी कमी केली आणि सर्व अनुदानित वर्गवारीकरिता वीज दर हा सरासरी खर्चाच्या ५० टक्के इतका तरी असावा, असे विहीत केले. वीज गुणक प्रोत्साहन-अधिदान; ठोक सूट आणि त्वरीत अदायगी प्रोत्साहन-अधिदान यासारखे रिबेट्स/ प्रोत्साहन-अधिदान हे सध्याच्या पातळीवर राहू देण्यांत आले.
- या वीज दर आदेशाद्वारे मराविमंच्या सर्व मंडलांतील सर्व वर्गवारीतील ग्राहकांवरील पावि तोटे आकार मागे घेण्यांत आला आहे. त्या ऐवजी, निर्धारीत कमाल २६.८७ टक्क्याचे लक्ष्य व ३६.६२ टक्के इतके प्रत्यक्ष पावि तोटे मधील फरकावरील खर्च भरुन काढण्यासाठी, टॅरिफद्वारे क्रॉस-सबसिडी करणा-या ग्राहकवर्गावर 'नियामक दायित्व आकार' (Regulatory Liability Charge) लावण्यात आला आहे. नियामक दायित्व आकार ही भारतांत वीज नियामक प्रक्रियेत एक नवीन संकल्पना असून आयोगाने ग्राहकांच्या व मराविमंच्या दीर्घ-कालीन हिताच्या दृष्टीने एक वास्तववादी उपाय म्हणून तो सुरु केला आहे.
- नियामक दायित्व आकाराची प्रति वर्षी जमा होणारी रक्कम सुमारे रु.९४७ कोटी, हे तरतूद न केलेले दायित्व असून ते, जेव्हा पावि तोटे निर्धारित कमाल पातळीवर येतील तेव्हा, त्या ग्राहक वर्गवारींच्या वीज दरांत कपात करुन परत करण्यांत येईल.
- नियामक दायित्व आकार लावून देखील क्रॉस-सबसिडी करणा-या वर्गवारीचा वीज दर ४-६ टक्क्यांनी कमी करण्यांत आला आहे.
- कृषी-क्षेत्रासाठी वीज दर हा सरासरी पुरवठा खर्चाच्या ५० टक्क्याहून अधिक आहे.
- विजेचा मोठ्या प्रमाणात वापर करणा-यांना प्रोत्साहन-अधिदान देण्यासाठी, जे अन्यथा मराविमंला सोडून स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीच्या पर्यायाचा स्वीकार करण्याची शक्यता आहे, आयोगाने, करारांतर्गत विजेच्या मागणीवर आधारित, ज्यांचा भार गुणक

तुर्भे येथील टाटांचे संयंत्र

७५ टक्क्याहून अधिक आहे अशांसाठी भार गुणक प्रोत्साहन-अधिदान सुरु केले आहे , आणि वीज भार आलेखांतील चढ-उतार कमी करण्यासाठी कमाल मागणीच्या कालावधीतील व कमाल मागणी नसलेल्या कालावधीतील विजेच्या वापरासाठी वीज दरांतील फरक वाढविला आहे.

नूतनशील आणि अ-पारंपरिक उर्जा स्त्रोतांपासून उर्जा

पवन उर्जेची प्राप्ती आणि इतरांना विक्रीसाठी आणि/किंवा स्व-वापरासाठी वहन

सन २००२ मध्ये सुरु झालेल्या दीर्घ प्रक्रियेच्या अखेरीस, ज्यांत तांत्रिक तपासणी बैठका, जनतेच्या अभिप्रायासाठी प्रस्ताव तयार करणे आणि दिनांक २२ एप्रिल, २००३ रोजी झालेली जाहीर सुनावणी यांचा समावेश होतो, आयोगाने त्याच्यासमोर असलेल्या काही याचिकांवर एक समाईक आदेश १८ नोव्हेंबर, २००३ रोजी पारित केला, ज्याद्वारे पवन उर्जा प्रकल्पांपासून वीज मिळविणे व संबंधीत बाबीसाठी कार्यप्रणाली ठरविण्यात आली.

पुढील काही वर्षांत लागणा-या विजेच्या मागणीत होणारी मोठी वाढ व मर्यादित जल विद्युत स्त्रोत लक्षांत घेता, राज्याला प्रामुख्याने औष्णिक विजेवरच अवलंबून राहावे लागणार आहे. या परिस्थितीची नोंद घेत आदेशांत पुढे नमूद करण्यांत आले आहे की, औष्णिक आणि इतर खनिज-इंधनावर आधारित विजेचा खर्च वाढतच राहणारा असल्याने पवन उर्जेचे महत्व वाढले आहे व या उर्जेचे तंत्रज्ञानही झपाट्याने विकसीत होत आहे. पर्यावरणास पोषकता व कायमपणे उपलब्धता याशिवाय पवन उर्जेचे आणखी एक आकर्षण म्हणजे ग्रीडच्या शेवटी असलेले सोयीस्कर स्थळाचे ठिकाण होय.

सुरुवातीला पवन उर्जेचरील खर्च जास्त असतो, परंतु कर्जाची परतफेड झाल्यावर, यांत अस्थिर खर्च कोणताच नसल्यामुळे, हा खर्च कमी होतो. पवन उर्जेच्या सुरुवातीच्या खर्चाचा जास्त बोजा ग्राहकांवर पडू नये परंतु त्याचबरोबर या नवीन क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर खाजगी गुंतवणूक व्हावी यासाठी विजेचा दर आकर्षक असणेही आवश्यक आहे, या दोन्ही बाबींची दखल आयोगाने आपल्या आदेशांत घेतली आहे.

वरील कारणामुळे जादा वीज दराचा भार ग्राहकांवर पडू नये म्हणून पवन उर्जेमधील नवीन क्षमता, ज्यामधील वीज विद्युत उपक्रमांना/ परवानेधारकांना विकण्यासाठी परवानगी द्यावयाची आहे, १०व्या पंचवार्षिक योजनेच्या दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी संपणा-या उर्वरित ४ वर्षाच्या काळात, ७५० मेगावॉटहून अधिक नसावी. स्व-वापरासाठी किंवा इतरांना विक्रीसाठी उभारण्यांत येणा-या प्रकल्पांच्या बाबतीत अशी कोणतीच मर्यादा विहीत करण्यांत आलेली नाही. वीज दराचे पुनर्विलोकन, या तारखेनंतर किंवा जर त्याआधी ही ७५० मेगावॉटची मर्यादा गाठण्यांत आली तर तेव्हा, करण्यांत येईल.

आयोगाचे तर याबाबतीत असे मत आहे की, चालू पंचवार्षिक योजनेच्या काळांतच अशा प्रकल्पांची स्थापित क्षमता १००० मेगावॉटपर्यंत पोहचावी की जेणेकरुन जादा उत्पादनाच्या परिणामस्वरुप उत्पादन खर्चात होणा-या कपातीमुळे पवन उर्जेवरील खर्च हा पारंपरिक पध्दतीने होणा-या वीज उत्पादनाच्या खर्चाइतका होण्यास मदत होईल.

या सर्व बाबींचा विचार करुन, आयोगाने पवन उर्जा प्रकल्पांची स्थुलमानाने तीन गटांत विभागणी केली आहे. प्रकल्प सुरु झालेल्या तारखेनुसार जुने व नवे प्रकल्प आणि त्यानुसार अशा प्रकल्पांतून निर्माण झालेल्या वीज खरेदीचा दर व इतर कार्यपध्दती निश्चित केल्या आहेत.

पवन उर्जा प्रकल्पांच्या ठिकाणी असलेल्या स्विचयार्ड व आंतर-जोडणी सुविधांचा मीटरींगच्या बिंदूपर्यंतचा खर्च विकासक सोसेल. वीज वाहून नेण्याकरिता मीटरींगच्या ठिकाणापासून पुढील पारेषण लाईन्सवरील व आनुषंगिक सुविधांवरील खर्च मराविमं/ विद्युत परवानेधारक करतील.

जोपर्यंत स्थानिक पातळीवरील पावि तोटे निश्चित करण्यासाठी सखोल अभ्यास पूर्ण होत नाही तोपर्यंत २ टक्के वहन आकाराबरोबरच समान ५ टक्के दराने पावि तोटे आकारही लागू राहील.

किंमतीच्या क्रमवारीनुसार वीज खरेदीचे तत्व (मेरिट ऑर्डर डिस्पॅच) मराविमं व इतर परवानेधारकांनी पवन उर्जा प्रकल्पांकडून केलेल्या वीज खरेदीस लागू राहणार नाही.

नगरपालिकेच्या घन कचऱ्यांतून वीज निर्मिती करणा-या उर्जा प्रकल्पांकडून वीज खरेदी

आढाव्याखालील वर्षांत, नगरपालिकेच्या घन कच-यावर आधारित उर्जा प्रकल्पांसंबंधी, एका विकासकाकडून आलेल्या याचिकेच्या संदर्भात, आयोगाने एक जाहीर सुनावणीही घेतली. याबाबतची जाहीर प्रक्रिया संपली असून अंतिम आदेश तयार करण्याचे काम चालू होते.

बायोमासवर आधारित प्रकल्पांकडून वीज खरेदी

बायोमासवर आधारित प्रकल्पांकडून वीज खरेदीचे दर व इतर कार्यप्रणाली निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र बायोमास एनर्जी डेव्हलपर्स असोसिएशनने सन २००३-०४ मध्ये एक याचिका दाखल केली. याबाबत जनतेच्या पुढे विचारार्थ एक प्रस्ताव ठेवण्यापूर्वी राज्यांत बायोमासचा उपयोग करुन वीज निर्मिती करण्यास वाव व तिच्या परिणामासंबंधी एक अभ्यासात्मक अहवाल तयार करुन घेण्याचे आयोगाने ठरविले.

विद्युत कंपन्यांमधील वाद

टाटा पॉवर कंपनीच्या परवान्यांची अर्थनिश्चिती

टाटा पॉवर कंपनी आणि रिलायन्स एनर्जी लि., या मुंबईत कार्य करणा-या देशांतील सर्वात मोठ्या व सर्वात जुन्या खाजगी विद्युत कंपन्यांमधील कांही वादांसंदर्भात आयोगाने सन २००३-०४ मध्ये आदेश पारित केले. एका प्रकरणांत, रिलायन्स एनर्जी लि.ने आरोप केला की त्यांच्या क्षेत्रांतील

१००० KVA पेक्षा कमी कमाल मागणी असलेल्या ग्राहकासह, टाटा पॉवर कंपनीने त्यांच्या परवान्यांतील अटींचा व महाराष्ट्र शासनाच्या धोरणांचा भंग करीत, विजेची किरकोळ विक्री करणे सुरु केले असून अशा रितीने ते त्यांच्या ग्राहकांना बेकायदेशीररित्या पळवीत आहेत. रिलायन्स एनर्जी लि.चे असे म्हणणे होते की, तेच या क्षेत्रातील अशा ग्राहकांकरिता अधिकृत वितरक असल्यामुळे टाटा पॉवर कंपनी अशा रितीने वागू शकत नसून वाटल्यास ते अशा ग्राहकांकरिता रिलायन्स एनर्जी लि.ला विजेचा ठोक पुरवठा करु शकतात.

यामुळे टाटा पॉवर कंपनीला देण्यात आलेल्या परवान्यांतील अटींची अर्थनिश्चिती करणे आणि विद्युत क्षेत्रांत स्पर्धा, ग्राहक हित व इतर बाबींसंदर्भात कायद्यातील तरतुदींचा विचार करणेही आवश्यक होते. टाटा पॉवर कंपनीला त्यांच्या परवान्यानुसार रिलायन्स एनर्जी लि.च्या क्षेत्रांतील किरकोळ ग्राहकांना वीज पुरवठा करण्यास मर्यादा असल्याचा रिलायन्स एनर्जी लि.चा दावा आयोगाने दिनांक ३ जूलै, २००३ च्या आदेशाने नाकारला.

तथापि, या निष्कर्षाचा स्पर्धेच्या वाढीशी असलेला संबंध लक्षांत घेऊन आयोगाने याचे विश्लेषणही केले. आदेशांत नमूद करण्यांत आले की -

"बीएसईएस (रिलायन्स एनर्जी लि.) ला त्याच्या कांही वर्गवारीतील ग्राहकांना सेवा देणे शक्य व्हावे म्हणून उर्जेचा पुरवठा करण्याची टाटा पॉवर कंपनीवर जरी जबाबदारी असली तरी बीएसईएसवर ज्या ग्राहकांना विद्युत पुरवठा करण्याचे बंधन आहे त्यांना देखील वीज पुरविण्याचा त्यांना अनिर्बंध हक्क (परंतु बंधन नाही) असल्याचा टाटा पॉवर कंपनीचा दावा, स्पर्धेच्या वाढीसाठी सर्वांना समान संधी देण्याच्या तत्त्वाच्या विरुध्द आहे." त्यामुळे, मुंबईच्या काही भागांत समांतर परवाने आणि परस्परव्यापी (overlapping) वितरणाचे नेटवर्क यामुळे उद्‌भवलेल्या असाधारण परिस्थितीच्या संदर्भात, प्रत्येक परवाना क्षेत्रांत विजेच्या विक्रीच्या बाबतीत स्पर्धा आणि विकल्पास कशा पध्दतीने वाव देता येईल ते निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु करणे हे आदेशाचे उद्दिष्ट होते आणि त्यानुसार रिलायन्स एनर्जी लि. व टाटा पॉवर कंपनी यांना विअ, २००३ च्या कलम १४ आणि ४२ मधील प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी सल्लागारांची नियुक्ति करण्यास व कार्यकक्षा सादर करण्यास सांगण्यात आले. दरम्यानच्या काळांत, टाटा पॉवर कंपनीला रिलायन्स एनर्जी लि.च्या क्षेत्रांतील १००० KVA पेक्षा कमी कमाल मागणी असलेल्या ग्राहकांना नवीन वीज जोडण्या देण्यास मनाई करण्यांत आली आहे.


औष्णिक विद्युत केंद्र, नाशिक

रिलायन्स एनर्जी लि.ने दिलेला " चुकीचा " रिबेट

टाटा पॉवर कंपनीने असा आरोप केला की रिलायन्स एनर्जी लि. ठराविक ग्राहकांना वीज दरांत रिबेट देत असून त्यासाठी विद्युत नियामक आयोग अधिनियमाखाली आवश्यक असल्याप्रमाणे आयोगाची परवानगी घेतलेली नसल्याने ही कृती बेकायदेशीर आहे.

आयोगाने २० फेब्रुअरी, २००४ च्या आदेशांत स्पष्ट केले की हे रिबेट्स अनधिकृत आहेत व त्यांचा आर्थिक बोजा रिलायन्स एनर्जी लि.ने सोसावा आणि या नुकसानीची भरपाई कशी करावयाची ते त्यांनी स्वतःच ठरवावे.

इतर आदेश

मुंबईत वीज पुरवठ्यात स्पर्धेस परवानगी देणे, रिलायन्स एनर्जी लि. व टाटा पॉवर कंपनीचे सवलतीचे वीज दराबाबत आणि सयुक्तिक व रास्त वीज दराची निश्चिती

श्री. शिरीश देशपांडे यांनी त्यांच्या याचिकेत, मुंबईत वीज पुरवठ्यासाठी स्पर्धेस मान्यता देणे, काही परवानेधारकांची मक्तेदारी मोडीत काढणे आणि सर्व परवानेधारकांच्या वीज दरांची निश्चिती कायद्यातील तरतुदींनुसार व्हावी, असे मुद्दे मांडले आहेत. तोपर्यंत, मराविमंने त्यांचा वीज दर सुधारणेचा प्रस्ताव सादर केलेला होता. रिलायन्स एनर्जी लि. व टाटा पॉवर कंपनी यांनाही प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यांत आले असता त्यांनी देखील त्यांचे प्रस्ताव अनुक्रमे सप्टेंबर आणि ऑक्टोबर, २००३ मध्ये आयोगास सादर केले आहेत. बेस्टला देखील त्याप्रमाणे सूचित केले असता त्यांनी मात्र, पूर्वीपासून अस्तित्वांत असलेल्या वीज दराचे पूनर्विलोकन आयोग, निदान पुरेसे कारण असल्याशिवाय, स्वतःहून करु शकत नाही, अशी भूमिका घेतली. आयोगाने सन २००३-०४ वर्ष संपल्यानंतर या याचिकेवर लागलीच अंतिम आदेश दिले असून त्यांत बेस्टला काही निदेश देण्यांत आले आहेत.

स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पावर घालण्यात आलेल्या अटी

उरण येथील प्रकल्पातील ओएनजीसीच्या करारांतर्गत मागणीत कपात

ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) यांनी जानेवारी, २००३ मध्ये दाखल केलेल्या याचिकेत विनंती केली की रायगड जिल्ह्यांतील उरण येथील त्यांच्या कारखान्याच्या करारांतर्गत मागणीत कपात करण्यास मराविमंने परवानगी द्यावी आणि त्यांनी स्ववापरासाठी उभारलेल्या वीज निर्मिती करणा-या अतिरिक्त टर्बाइन जनरेटिंग सेटवर मराविमं यांनी घातलेल्या अटी रद्द करण्यांत याव्यात. त्यांनी अशीही विनंती केली की त्यांना एक विद्युत निर्मिती उपक्रम म्हणून न संबोधता त्यांना आपल्या विजेची आवश्यक पातळी ठरविण्याची मुभा असावी.

ओएनजीसीने आयोगाच्या नियामक अधिकारांच्या क्षेत्रांत सर्व-सामान्य महत्वाचा असा प्रश्न उपस्थित केला की, भार-नियमनाच्या आणि तुटवड्याच्या परिस्थितीत जर एखाद्या ग्राहकाला त्याची मागणी कमी करुन कमी वीज वापरावयाची असेल तर मराविमं त्याच्या गरजेपेक्षा जास्त वीज वापरण्यास त्याला सांगू किंवा सक्ती करु शकते का, आणि जर ओएनजीसीने प्रत्यक्षांत न वापरलेल्या विजेची देखील रक्कम चुकती करण्याचा मराविमंने आग्रह धरला तर त्यामुळे मान्यताप्राप्त दर सूचीचा

भंग होईल. ओएनजीसीने असेही निदर्शनास आणले की, नव्या विअ, २००३ खाली मराविमंने घातलेल्या अटीं अवैध ठरतात.

आयोगाने १३ फेब्रुअरी, २००४ च्या आदेशाने, ज्याचा अशाच प्रकारच्या इतर प्रकरणांवर देखील परिणाम होऊ शकेल, असा निर्णय दिला की, ओएनजीसीची स्व-वापरासाठीची वीज निर्मिती लक्षांत न घेता मराविमंने घातलेली करारांतर्गत किमान मागणीची अट, विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ आणि विअ, २००३ या दोन्ही कायद्यांखाली, समर्थनीय नाही. विद्युत (पुरवठा) अधिनियम, १९४८ च्या कलम ४४ खाली स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांच्या उभारणीस मान्यता देतांना किंवा कलम ४९ खाली पुरवठ्याच्या करारांत, अशी अट घालणेही मराविमंला शक्य नव्हते. आयोगाने स्पष्ट केले की, मराविमंला अशा स्वेच्छानुसारी अटी व शर्ती लादण्याचे अनिर्बंध अधिकार नसून तसे केल्यास तो वीज पुरवठादार म्हणून लाभलेल्या मक्तेदारीच्या स्थितीचा दुरुपयोग केल्यासारखे होईल.

स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांसाठी व्यवस्था

स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांच्या संदर्भात इतर काही प्रकरणे आयोगापुढे सन २००३-०४ मध्ये होती. विअ, २००३ चे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वीज निर्मितीसाठी परवान्याची गरज नसणे व स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीसाठी उदार धोरण, ही वस्तुस्थिती तसेच स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांच्या अतिरिक्त विजेचा उपयोग होण्यास वाव लक्षांत घेता व विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन आणि बल्लारपूर इंडस्ट्रीज लि. यांनी दाखल केलेल्या याचिका विचारांत घेऊन, आयोगाने स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांसंबंधी धोरण तयार करण्याचे ठरविले असून त्यावर जनतेचे मत अजमावल्यानंतर त्यास अंतिम स्वरुप देण्यात येईल.

वीज दरापोटी महाराष्ट्र शासनाचे अनुदान

विअ, २००३ अंमलांत आल्यानंतर लागलीच, वेगवेगळी कारणे दर्शवून मराविमं आणि मुळा प्रवरा विद्युत सहकारी संस्थेच्या कृषी आणि इतर काही वर्गवारीतील ग्राहकांना लागू असलेल्या वीज दरापोटी अनुदान देण्याकरिता महाराष्ट्र शासनाने आयोगाकडे काही अर्ज सादर केले. अशा प्रकरणी, अधिनियमाच्या कलम ६५ नुसार, संबंधित परवानेधारकास नुकसानभरपाईची रक्कम शासनास आगाऊ द्यावी लागते. ही नुकसानभरपाई कशा पध्दतीने करावयाची ते आयोगाने (विनियमांद्वारे) विहीत करावयाचे असते.

